# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९*
E-Mail : jtdirrom@gmail.com Web : www.jdteromumbai.com


---

**कार्यालयीन आदेश**

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०१२/१९४८
दिनांक : १७/७/२०१२

प्रति,
प्राचार्य,
सर्व संबधित संस्था,
(सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे)

विषय - अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पार्श्वनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे वीरमाता हिराबेन पी. शहा कॉलेज ऑफ फार्मसी, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे मान्यता रद्द करुन येथील विद्यार्थ्यांच्या स्थलांतराबाबत

संदर्भ - १. शासन पत्र क्र. टिईएम-२०१२/(प्र.क्र.८७)/तांशि-४, दि. ७.७.२०१२
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/पार्श्वनाथ/२०१२/८३३ दि.१२.०७.२०१२

उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र.१ अवये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत विषयांकित संस्थेची मान्यता रद्द करण्यांत आलेली आहे. सदर संस्थेतील विद्यार्थ्यांना इतर संस्थांमध्ये सामावून घेण्याच्या सूचना परिषद व शासनामार्फत संदर्भाधीन पत्रान्वये देण्यांत आलेल्या आहेत. त्यामुळे आपल्या संस्थेत सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे तसेच **कमाल ६ विद्यार्थ्यांना** द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाच्या अभ्यासक्रमास एक विशेष बाब म्हणून खालील अटींच्या अधीन राहून तसेच विद्यार्थ्यांनी दिलेल्या विकल्पानुसार व गुणवत्तेनुसार स्थलांतरणाने प्रवेश देण्यांत येत आहे. सदर प्रवेश हे संस्थेच्या मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त असले तरी, संबंधित संस्थेने विद्यार्थ्यांना संस्थेत प्रवेश देण्यांत यांवा. विद्यार्थी स्थलांतरीत करण्यांत आलेल्या संस्थांना मान्यताप्राप्त प्रवेशक्षमतेपेक्षा अधिकच्या जागांना (Supernumerary seats) मान्यता देण्यांत येत आहे.

वरीलप्रमाणे संचालकांनी नमूद केलेल्या सूचना व खालील अटी व शर्तीच्या अधीन संबंधित विद्यार्थ्यांची बदली विनाअनुदानित संस्थेमध्ये विद्यापीठ नियमांच्या अधीन राहून करण्यांत येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चे सत्रकार्य, परिक्षा अर्ज इ. बाबी स्थलांतरीत संस्थेमार्फत करण्यांत यांवे.
२. संबंधित स्थलांतरीत केलेल्या संस्थेत लागु असलेले शैक्षणिक शुल्क शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नियमानुसार विद्यार्थ्यांना भरणे आवश्यक राहील. तसेच शैक्षणिक सवलती मिळत असल्यास त्यापुढेही सुरु राहतील.
३. विद्यार्थ्यांचे ओळखपत्र विद्यापीठाचा एनरोलमेंट, सत्र परिक्षेच्या गुणपत्रिका इ. तपासून पात्रतेनुसार संबंधित वर्षात संबंधित संस्थेने विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावे.
४. मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या नियमाप्रमाणे संस्थांनी अतिरिक्त तासिका घेऊन विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम तसेच टर्मवर्क पुर्ण करुन घ्यावे.
५. सध्या शिकत असलेल्या संस्थेतील विद्यार्थ्यां व्यतिरिक्त अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्थलांतर विद्यापीठाच्या नियमांच्या अधीन राहून करण्यांत येत आहे. तसेच स्थलांतरीत विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्र आपल्या स्थरावर तपासुन घेण्यात यावेत.
६. प्रवेश दिलेल्या संस्थेने विद्यार्थ्यांना तात्काळ रुजू करुन घ्यावे.

(जी.बी.धनोकार )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई.

प्रत :-
१. मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांना माहितीकरिता
२. संबधित संस्था. (सोबत जोडलेल्या यादीनुसार)
३. प्राचार्य, वीरमाता हिराबेन पी. शहा कॉलेज ऑफ फार्मसी, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे यांना कळविण्यांत येते की, त्यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ आवश्यक ती कागदपत्रे द्यावीत, विद्यापीठा संबधित कागदपत्रे संबधीत संस्थांना देण्यात यावीत व आवश्यक ती कार्यवाही करावी.
४. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांना माहितीकरिता.
५. संबधित विद्यार्थी (सहसंचालकांच्या : www.jdteromumbai.com संकेत स्थळावर उपलब्ध )

D:\Nikale\Degree Transfer 2011-12.doc